# प्रेसनोट

दिनांक– २८/११/२०१८.

**जिल्हा परिषद, ठाणे येथील कनिष्ठ अभियंता यांच्याविरूध्द अपसंपदा बाळगल्यावरून गुन्हा दाखल.**

दिनांक २७/११/२०१८ रोजी येथील, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, ठाणे येथील कनिष्ठ अभियंता **प्रज्वल नरेंद्र भोईर**, वय-३६ वर्षे, यांच्याविरुध्द चालु असलेल्या मालमत्तेच्या उघड चौकशीमध्ये त्यांनी अपसंपदा संपादीत केल्याचे निष्पन्न झाल्यावरून त्यांचेविरुध्द शासकीय सेवेत असताना संपादित केलेल्या अपसंपदेवरुन विक्रमगड पोलीस स्टेशन, पालघर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील लोकसेवक यांनी सन २००४ ते २०१५ या कालावधीत शासकीय सेवेत असताना, त्यांनी त्यांच्या सर्व ज्ञात व कायदेशीर मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा रक्कम रुपये १२,०६,२३५/- एवढया रकमेची अपसंपदा संपादीत केल्याचे निष्पन्न झाल्यावरून श्री. सुदेश आजगावकर, पोलीस निरीक्षक, अेसीबी ठाणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून लोकसेवक **प्रज्वल नरेंद्र भोईर** यांच्याविरुध्द् दिनांक २७/११/२०१८ रोजी विक्रमगड पोलीस स्टेशन, पालघर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक (संशोधन २०१८)अधिनियम सन १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. सलिल भोसले, अेसीबी, ठाणे हे करत असून, त्यांचा संपर्क क्र. ९००४३९८१३७ असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979**
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner